# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.12.2025** **वारःसोमवार**

---

1. संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू
2. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणं आपल्या सर्वांचं कर्तव्य असल्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून प्रतिपादन
3. भारतीय स्थलांतरितांमुळं अमेरिकन अर्थव्यवस्थेला मोठा फायदा झाला असल्याचं टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी इलॉन मस्क यांचं मत आणि
4. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 50 षटकांचा पहिला क्रिकेट सामना भारतानं 17 धावांनी जिंकला

**<u>संसद-हिवाळी अधिवेशन</u>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिलेल्या वृत्तानुसार, या अधिवेशनात 19 दिवसांच्या कालावधीत एकंदर पंधरा सत्रं होतील तसंच 13 विधेयकं मंजूर होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकारनं काल नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्वपक्षीय बैठक झाली. बैठकीला 36 राजकीय पक्षांचे 50 नेते उपस्थित होते. बैठकीनंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालण्यासाठी सरकारनं सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांना हिवाळी अधिवेशनादरम्यान सहकार्य करण्याचं आवाहन केलं असून दोन्ही सभागृहांच्या नियमांनुसार सरकार सभागृहात इतर कोणत्याही महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार असल्याचं ते म्हणाले.

**<u>पंतप्रधान-डिजिपी परिषद</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेमध्ये विशेषत: तरुणांमध्ये पोलिसांबद्दलची सार्वजनिक धारणा बदलण्याची तातडीची गरज असल्याचं सांगून व्यावसायिकता, संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव वाढवून हे शक्य असल्याचं म्हंटलं आहे. रायपूर इथं काल 60 व्या अखिल भारतीय पोलिस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या परिषदेचं अध्यक्षपद भूषवताना, पंतप्रधानांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस आणि प्रशासनाला निर्जन बेटांच्या एकत्रीकरणासाठी नाविन्यपूर्ण धोरण अवलंबण्याचे आदेश दिले. नॅटग्रीड अंतर्गत एकत्रित केलेल्या माहितीचा प्रभावी वापर करण्याचे तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे या प्रणालींना जोडून कृतीशील बुद्धिमत्ता निर्माण करण्याचे निर्देश पंतप्रधानांनी दिले.

**<u>मनकीबात</u>**

नैसर्गिक शेती हा भारतीय परंपरेचा भाग असून आपल्या धरणी मातेचं संरक्षण करण्यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आकाशवाणी वरील मन की बात या कार्यक्रमातून काल त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. कृषी क्षेत्रात देश प्रगती करत असून देशात विक्रमी म्हणजे 357 दशलक्ष टन अन्नधान्याचं उत्पादन झाल्याचं पंतप्रधान म्हणाले. मध उत्पादन आणि मध निर्यातीच्या क्षेत्रात देशानं केलेल्या प्रगतीचाही त्यांनी उल्लेख केला. अंतराळ आणि क्रीडा क्षेत्रात देशानं केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याची स्पर्धा इस्त्रोनं आयोजित केली होती, त्याची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सांगत;

पुण्यातल्या एका संघानं यात यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

**सरस आजीविका अन्न महोत्सव**

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान आज नवी दिल्ली इथं सरस आजीविका अन्न महोत्सव 2025 चं उद्घाटन करतील. ग्रामीण विकास मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार देशभरातील 25 राज्यांमधील सुमारे 300 लखपती दीदी आणि स्वयं-सहायता गटातील महिला या महोत्सवात सहभागी होतील. एकूण 62 दालनांपैकी 50 दालनांवर तयार अन्न उपलब्ध असेल, तर 12 दालनांवर नैसर्गिक अन्न उत्पादनं सादर केली जातील. हरियाणा, अरुणाचल प्रदेश, महाराष्ट्र, केरळ, आसाम, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा आणि गुजरात ही राज्यं या अन्न महोत्सवात सहभागी होत आहेत, असं मंत्रालयानं म्हंटलं आहे. दिल्ली आणि शेजारच्या शहरांमधील पर्यटकांना देशातील विविध खाद्य संस्कृती आणि सामाजिक रचनेचं दर्शन घडवणाऱ्या 500 हून अधिक उत्कृष्ट पदार्थांचा आस्वाद घेता येईल. हा अन्न महोत्सव या महिन्याच्या 9 तारखेपर्यंत सकाळी साडे 11 ते रात्री साडे 9 या वेळेत पर्यटकांसाठी सुरू राहील.

**मस्क**

भारतीय स्थलांतरितांमुळं अमेरिकन अर्थव्यवस्थेला मोठा फायदा झाला असल्याचं सांगत टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी इलॉन मस्क यांनी एच-वन बी व्हिसा कार्यक्रमाचं समर्थन केलं आहे. झीरोधाचे सह-संस्थापक निखिल कामथ यांच्याशी झालेल्या पॉडकास्ट संभाषणात त्यांनी ही टिप्पणी केली. मस्क यांनी अमेरिकेला आता भारतातील उच्च-कुशल कामगारांची गरज असल्याचं सांगून काही आउटसोर्सिंग कंपन्यांकडून व्हिसा प्रणालीचा गैरवापर केला गेल्याचा आरोपही काल प्रसिद्ध झालेल्या पॉडकास्टमध्ये केला. अमेरिकेला भारतीयांच्या प्रतिभेचा प्रचंड लाभ झाला असून विशिष्ट पदांसाठी कुशल मनुष्यबळाच्या अभावी मस्क यांच्या कंपन्या संघर्ष करावा लागतो असं त्यांनी म्हंटलं आहे. जगभरातील प्रतिभेचा अमेरिकेत वापर करण्यासाठी एच-वन बी कार्यक्रम हा एक महत्त्वाचा मार्ग असल्याचं समर्थन करताना, त्यांनी त्यातील कमतरतेची देखील कबुली दिली. काही आउटसोर्सिंग कंपन्यांवर एच- वन बी व्हिसा कार्यक्रमाचा गैरफायदा घेतल्याचा आरोप करत त्यांनी टीका केली आणि हा कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्याऐवजी त्यातील कमतरता दूर करून सुधारणा करण्याचं आवाहन केलं. कुशल परदेशी कामगारांची आवश्यकता मान्य करतानाच एच- वन बी व्हिसासाठी पात्रता निकष अधिक कठोर करण्याच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील भूमिकेच्या पार्श्वभूमीवर मस्क यांनी हे भाष्य केलं आहे. स्थलांतरितांसंबंधी 1990 च्या कायद्याद्वारे तयार केलेला एच- वन बी व्हिसा कार्यक्रम अमेरिकी नियोक्त्यांना विशिष्ट व्यवसायांमध्ये परदेशी कामगारांना कामावर ठेवण्याची परवानगी देतो.

**हॉर्नबिल**

नागालँड आज आपला 63 वा स्थापना दिवस साजरा करत आहे. राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी राज्यातील जनतेला हार्दिक शुभेच्छा दिल्या. 26 वा हॉर्नबिल महोत्सव देखील आज कोहिमा इथल्या हेरिटेज व्हिलेजमध्ये सुरू होत आहे. दहा दिवस चालणाऱ्या या भव्य कार्यक्रमात सर्व प्रमुख नागा जमाती एकत्र येतील आणि लोकगीतं, संगीत, हस्तकला आणि पाककृतींद्वारे राज्यातील जिवंत परंपरांचं दर्शन घडवलं जाईल. पर्यटन उपक्रम म्हणून सुरू झालेल्या या महोत्सवानं दोन दशकांहून अधिक काळ जगातील सर्वात प्रतिष्ठित सांस्कृतिक महोत्सवांमध्ये स्थान मिळवलं आहे. देश-विदेशातील पर्यटकांना आणि कलाकारांना आकर्षित करणारा हॉर्नबिल महोत्सव आज एक जागतिक व्यासपीठ ठरला आहे.

**गीताजयंती**

गीता जयंती आज साजरी केली जात आहे. 5 हजार वर्षांपूर्वी कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर भगवान श्रीकृष्णानं अर्जुनाला भगवद्गीतेचे कालातीत उपदेश दिले त्या क्षणाचं स्मरण या दिवशी केले जातं. गीता जयंती हा केवळ धार्मिक दिवस नसून तो भगवान श्रीकृष्णानं दिलेल्या वैश्विक ज्ञानाची आठवण करून देतो. लाखो लोकांना त्यांच्या आध्यात्मिक आणि दैनंदिन जीवनात हा उपदेश मार्गदर्शन करत राहतो. भगवद्गीता काळाच्या पलीकडे जाणारी शिकवण तसंच जीवन, कर्तव्य आणि अस्तित्वाच्या स्वरूपाबद्दलच्या

सर्वात मूलभूत प्रश्नांची उत्तरं देते. गीता जयंती पाळणं म्हणजे भगवद्गीतेच्या उपदेशांवर चिंतन करण्याची आणि त्यांना जीवनात समाविष्ट करण्याची संधी आहे. आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भगवद्गीतेबद्दल वाढत्या जागतिक औत्सुक्यावर प्रकाश टाकला.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेट मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पन्नास षटकांच्या 3 सामन्यांच्या मालिकेतील काल झालेल्या पहिल्या सामन्यात, रांची इथं जेएससीए आंतरराष्ट्रीय मैदानावर भारतानं दक्षिण आफ्रिकेचा 17 धावांनी पराभव केला. 50 षटकांत 350 धावांचं लक्ष्य गाठताना, 4 चेंडू शिल्लक असताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ 332 धावांवर बाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून मॅथ्यू ब्रीट्स्कीनं सर्वाधिक 72 धावा केल्या, मार्को यान्सेननं 70 आणि कॉर्बिन बॉशनं 67 धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवनं 4 तर हर्षित राणानं 3 बळी घेतले.

तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहलीच्या 120 चेंडूंत 135 धावांच्या जोरावर भारतानं निर्धारित 50 षटकांत 8 बाद 349 धावा केल्या. कोहलीनं पन्नास षटकांच्या सामन्यातील त्याचं 52 वं आंतरराष्ट्रीय शतक नोंदवून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच स्वरूपाच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक शतकांचा नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. तर, रोहित शर्मानं पन्नास षटकांच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक 352 षटकार पूर्ण करुन शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला. कर्णधार केएल राहुलनं 60 धावा केल्या तर रोहित शर्मानं 57 धावा केल्या. विराट कोहलीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. या विजयासह भारतानं तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज मणिपूर आणि ओडिशामध्ये पहाटे दाट धुक्याबरोबरच पुढील तीन दिवस हिमाचल प्रदेशातही अशीच हवामान परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे. येत्या दोन दिवसांत पंजाब, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात शीतलहरीच्या स्थितीच्या इशाऱ्यासह आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि तेलंगणात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाजही विभागानं वर्तवला आहे. आज कर्नाटकमध्ये विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळ येण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.